आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२७ नोव्हेंबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विरोधी पक्षांच्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- उद्योगपती गौतम अदानी यांच्यावरचे लाचखोरीचे आरोप गंभीर असून त्यांना अटक करावी, अशी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची मागणी

- मुख्यमंत्रीपदाबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जो निर्णय घेतील तो शिवसेनेला मान्य असल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भूमिका

- झारखंडचे मुख्यमंत्री म्हणून हेमंत सोरेन यांचा उद्या शपथविधी

- बालविवाह मुक्त भारत अभियानाला आजपासून देशभरात सुरुवात

**आणि**

- ICC कसोटी क्रिकेट गोलंदाजी मानांकनात जसप्रित बुमराह पुन्हा अग्रस्थानी

**<><><><><>**

अदानी उद्योग समूहाच्या लाचखोरी प्रकरण आणि विविध मुद्यांवरून विरोधकांच्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

लोकसभेचं कामकाज सुरु झाल्यानंतर सभागृहात अदानी प्रकरण तसंच उत्तर प्रदेश आणि मणिपूरमधला हिंसाचार या मुद्द्यांवरून गदारोळ झाला. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना सदनाचं कामकाज चालवण्यासाठी सभागृहाचे शिष्टाचार आणि प्रतिष्ठा राखण्याची वारंवार विनंती केली. मात्र,

विरोधकांनी सभागृहाच्या हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरू ठेवली. त्यामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. कामकाज पुन्हा सुरु झाल्यानंतर गदारोळ कायम राहिल्यामुळे सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेत, अदानी लाचखोरी प्रकरण, तसंच उत्तर प्रदेशातल्या संभल, आणि मणिपूर हिंसाचार प्रकरणी विरोधकांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. सभागृहाचं कामकाज सु ुरु ठेवण्याचं आवाहन त्यांनी सदस्यांना केलं. मात्र गोंधळ सुरु राहिल्यानं कामकाज प्रथम साडे अकरा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

दरम्यान, उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेत लाचखोरीचे गंभीर आरोप असून त्यांना अटक करावी, अशी मागणी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे.

**<><><><><>**

भारतीय रेल्वेनं हायस्पीड रेल्वेच्या निर्मीती आणि उत्पादनाचं काम सुरू केलं असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. इंटिग्रल कोच फॅक्टरीच्या सहकार्यानं हाय स्पीड रेल्वेची रचना तयार करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

समाज माध्यमावर प्रसारित होणारा अश्लील मजकूर रोखण्यासाठी सध्याचे कायदे आणखी मजबूत करणं गरजेचं असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना सांगितलं.

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत देशातल्या ८० कोटी लोकांना लाभ झाला असल्याची माहिती अन्न आणि सार्वजनिक वितरण राज्यमंत्री निमुबेन बांभनिया यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात दिली.

<><><><><>

मुख्यमंत्रीपदासाठी भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जो निर्णय घेतील त्याला शिवसेनेचा पूर्ण पाठिंबा आहे, असं शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज ठाण्यात बातमीदारांशी बोलत होते. मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरवण्यासाठी आणि सरकार स्थापनेसाठी आपला कोणताही अडसर नाही, कसलीही नाराजी नाही असं आपण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना दूरध्वनीद्वारे कळवल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

महायुतीच्या, राज्यातल्या प्रमुख नेत्यांची उद्या दिल्लीमधे, भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांच्याशी भेट होणार आहे, त्यात सरकार स्थापनेबाबत निर्णय होईल, असं त्यांनी सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनीही आज मुंबईत बातमीदारांशी बोलताना याला दुजोरा दिला.

एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या भूमिकेबद्दल भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखऱ बावनकुळे यांनी त्यांचे आभार मानले आहेत. ते नागपूर इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. महायुतीमध्ये मुख्यमंत्रीपद महत्वाचं नसून राज्यातल्या जनतेचं कल्याण महत्वाचं आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

झारखंडचे मुख्यमंत्री म्हणून झारखंड मुक्तिमोर्चाचे नेते हेमंत सोरेन यांचा शपथविधी उद्या होणार आहे. रांचीमधे मोऱ्हाबादी मैदानावर होणाऱ्या सोहळ्यात राज्यपाल संतोषकुमार गंगवार त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ देतील. या सोहळ्यासाठी इंडिया आघाडीच्या नेत्यांबरोबरच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनाही आमंत्रित केलं असल्याचं सोरेन यांनी रांची इथं बातमीदारांशी बोलताना सांगितलं. ८१ सदस्यांच्या झारखंड विधानसभेत इंडिया आघाडीचं संख्याबळ ५६ असून, भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे २४

उमेदवार निवडून आले आहेत. १ जागा झारखंड लोकतांत्रिक क्रांतीकारी मोर्चानं जिंकली आहे.

**<><><><><>**

यापुढे निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात या प्रमुख मागणीसाठी काँग्रेस स्वाक्षरी मोहीम राबवणार आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. यासंदर्भात नुकतीच दिल्लीत बैठक झाली. कॉंग्रेस अध्यक्ष मल्ल्लीकार्जुन खर्गे, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी आपण स्वतः चर्चा केली आहे. देशभरात या संदर्भात काँग्रेस जनआंदोलन करणार आहे. राज्यात दोन दिवसानंतर सह्यांची मोहीम सुरु केली जाईल. कोट्यावधी नागरिकांच्या सह्यांचं निवेदन राष्ट्रपती, प्रधानमंत्री, सरन्यायाधीश आणि निवडणूक आयोगाला देणार असल्याचं पटोले यांनी सांगितलं.

यावर, महाविकास आघाडी मतदान यंत्रावर अविश्वास दाखवून मतदारांचा अपमान करत असल्याची टीका भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. आपली मतं कमी का झाली, यावर त्यांनी चिंतन करावं, असं ते म्हणाले.

तर, काँग्रेसचा जेव्हा निवडणुकीत पराभव होतो, तेव्हाच ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जातं, अशी टीका भाजपा प्रवक्ते संबित पात्रा यांनी केली आहे.

**<><><><><>**

विकसित भारत २०४७ च्या संकल्पाला जोडूनच बालविवाहमुक्त भारताचं लक्ष्य असल्याचं केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं त्यांच्या उपस्थितीत आजपासून देशभरात बालविवाह मुक्त भारत अभियानाची सुरुवात झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. गेल्या दहा वर्षांत महिला सक्षमीकरणासाठी सरकारनं लिंगभाव समानतेसाठी जेंडर बजेटसारखी विविध पावलं उचलली आहेत, असं त्या म्हणाल्या.

बालविवाहासारख्या प्रथेचं देशातून समूळ उच्चाटन करणं, हा या अभियानाचा उद्देश आहे. या कार्यक्रमात बालविवाह मुक्त भारत पोर्टलची सुरुवात करण्यात आली. जागरुकता वाढवणं, तसंच बालविवाहासारख्या घटनांची त्वरीत माहिती मिळण्यासाठी या पोर्टलचा उपयोग होणार आहे.

**<><><><><>**

ICC,अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट समितीच्या कसोटी क्रिकेट गोलंदाजांच्या मानांकनात भारताच्या जसप्रित बुमराहनं पुन्हा अग्रस्थान पटकावलं आहे. पर्थ इथं झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी सामन्यात  केलेल्या कामगिरीमुळे बुमराहनं दक्षिण आफ्रिकेच्या कगीसो रबाडाला, तसंच दुसऱ्या क्रमाकांवर असलेल्या ऑस्ट्रेलियाच्या जोश हैजलवुडला मागं टाकत पहिलं स्थान मिळवलं. पर्थ कसोटीत बुमराहनं ८ गडी बाद केले होते.

**<><><><><>**

विकसित भारत युवा नेतृत्व चर्चासत्र या प्रश्नमंजुषेत भाग घेण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तरुणवर्गाला केलं आहे. विकसित भारत ही  चारस्तरीय स्पर्धा आहे. यात १५ ते २९ वयोगटातल्या व्यक्तीला भाग घेता येईल. २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या डिजिटल प्रश्नमंजुषेने या स्पर्धेला सुरुवात होईल.

**<><><><><>**

रत्नागिरीत स्थानबद्ध असताना स्वातंत्र्यवीर सावरकर शिरगावमध्ये दामले यांच्या घरात राहायला गेले, त्या घटनेला आज १०० वर्षं पूर्ण झाली. सावरकरांच्या स्मृतींचा ठेवा असलेली ती खोली दामले कुटुंबीयांनी जपून ठेवली आहे. आमच्या रत्नागिरीच्या वार्ताहरानं याविषयी माहिती दिली...

**व्हीसी- अनिकेत कोनकर (२३ सेकंद)**

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यानं पद्दुचेरी आणि करैकल भागात पावसानं संततधार धरली आहे. या भागातल्या नागरिकांना मदत करण्यासाठी मुख्यमंत्री एन रंगास्वामी यांनी संबंधित सर्व विभागाची आढावा बैठक बोलावली. संभाव्य पुरासह अन्य धोक्यांशी मुकाबला करण्यासाठी  राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

फेंगल चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर तामिळनाडूच्या किनारी भागाला मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे. तसंच आंध्र प्रदेशाच्या किनारपट्टीवरही मुसळधार पावसाची शक्यता आहे. मच्छिमारांनी पुढचे तीन दिवस बंगालच्या उपसागरात, तामिळनाडूच्या किनाऱ्यावर आणि दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनाऱ्यावर न जाण्याचा सल्ला हवामान विभागानं दिला आहे.

**//<><><><><>//**